# पुणेरी स्वप्न

## सुधीर कारखानीस



ई साहित्य प्रतिष्ठान
सादर करीत आहे

# पुणेरी स्वप्न

लघु कादंबरी

_

--सुधीर कारखानीस--

# पुणेरी स्वप्न

**लेखक: सुधीर कारखानीस**
ए 902 एकता मेडोज
सिद्धार्थ नगर, मागाठणे
बोरीवली ईस्ट, मुंबई 400066
मोबाइल 9223298186
ई मेल sudhirkarkhanis@yahoo.com

**मुखपृष्ठ संकल्पना- सुधीर कारखानीस**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:
ई साहित्य प्रतिष्ठान
ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन दिनांक :
©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय :

**सुधीर कारखानीस**



शिक्षण व अनुभव
शालेय शिक्षण एच डी हायस्कूल सोलापूर
एंजिनीरिंग ग्रॅज्युएट पुना एंजिनीरिंग कॉलेज, पुणे, महाराष्ट्र
पावर सेक्टर मध्ये सुमारे 50 वर्षांचा उच्च पदस्थ अनुभव
टाटा पावर कंपनी, एल अँड टी, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

प्रकाशित लेखन :-
अनेक तंत्रज्ञानविषयक पेपर व दोन तंत्रज्ञानविषयक पुस्तके
मराठी लघुकथा संग्रह “प्रतिबिंब”, “तरंग”, “गगन भरारी” “फुलोरा” , “पुष्पगंध”,
मराठी लघुकादंबरी “जिव्हाळा”, “प्रेमाचे बंध”. “परिमार्जन”

# अर्पणपत्रिका

माझी जेष्ठ कन्या –
डॉक्टर सौ मीनल,
(कॅलिफोर्निया. यू एस ए)
हिस
“पुणेरी स्वप्न”
ही लघु कादंबरी सप्रेम अर्पण.

# लेखकाचे मनोगत

सेवानिवृत्तिनंतरचा काळ म्हणजे स्वच्छंदी जीवन जगण्याचा काळ. नोकरी करताना किंवा स्वत:चा व्यवसाय चालवतांना असलेली अनेक बंधने निवृत्त जीवनात आपोआप नाहीशी होतात आणि राहतो फक्त अनियंत्रित स्वच्छंद.

हेच स्वच्छंदी जीवन कसे व्यतित करायचे याची प्रत्येकाने काही स्वप्ने रचलेली असतात. अनियंत्रित परिस्थितीच्या विस्तीर्ण जलाशयात आपल्या मनाप्रमाणे विहार करणे हा या स्वप्नांचा गाभा असतो. जीवनाची सर्व तत्त्वे स्वत:वर आणि फक्त स्वत:वरच केंद्रित करायची असतात. अपेक्षा माफक ठेवल्या तर त्या पूर्ण करणेही सोपे जाते. जीवन शक्य त्या प्रमाणात परिपूर्ण होऊ शकते.

बऱ्याचशा सुखवस्तु पुणेकरांनी आपल्या निवृत्तीनंतरच्या आयुष्याबद्दल अशाच माफक अपेक्षा ठेवलेल्या असतात. सकाळी पर्वतीवर फेरफटका, संध्याकाळी एकत्र बसून समवयस्कांबरोबर टाइमपास करणे. वेळोवेळी मंडळांच्या किंवा क्लबच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रमाना दाद देणे, कधीमधी ग्रुपने टूरला जाणे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व स्वच्छंदे करणे, या विनासायास पूर्ण होणाऱ्या अपेक्षा आनंदी मनाच्या पुणेकरानी बाळगलेल्या असतात.

पण या साध्या अपेक्षा पूर्ण करताना काही पुणेकराना अडचणी येतात. परिस्थितीचे नियंत्रण त्यांच्या हातात रहात नाही. परिस्थितीची सूत्रे पुढील पिढीच्या हातात जातात आणि मग निवृत्तीनंतरचे आयुष्य होते एक कठपुतलीचा शो. अशा वेळी, बदलत्या परिस्थितीला समजाऊन घेत बदलत्या प्रवाहात स्वत:ला वडिलकीच्या नात्याने सामावून घेणे हाच एक योग्य मार्ग ठरतो.

सुधीर कारखानीस

# पुणेरी स्वप्न

## लघु कादंबरी

## सुधीर कारखानीस

# पुणेरी स्वप्न

## प्रकरण १

वॉशिंग्टन डी. सी.  ही अमेरिकेची राजधानी आहे. सर्व अमेरिकेची सूत्रं वॉशिंग्टन डी. सी. वरून हालतात, पण ती काही जगाची राजधानी नाही, ती काही भारताची राजधानी नाही आणि महाराष्ट्राची तर नाहीच नाही.

पण ऐका जरा, पुण्याच्या डेक्कन जिमखाना भागात राहणाऱ्या बाळासाहेब चिटणिसांच्या घराची सूत्रंही वॉशिंग्टन डी सी वरुनच हालतात, बरं का !

हे एक खुल्ल सत्य आहे की पुण्याच्या असंख्य घरांचे लागेबांधे अमेरिकेतल्या  असंख्य शहरांशी जोडलेले आहेत. अगदी ह्यूस्टन पासून सिॲटल पर्यंत आणि सान डिएगो पासून बोस्टन पर्यंत, अमेरिकेतल्या प्रत्येक छोट्या मोठ्या शहरात पुण्याचे तरूण बसलेले आहेत आणि तिकडून शांतपणे पुण्यातल्या आपल्या घराची सूत्रं ते हलवतात.

त्याचं असं आहे, की  अमेरिकेत स्थिरावलेली ही  तरूण मंडळी आपापल्या ‘अमेरिकन ड्रीम’ चा पाठपुरावा तर करतातच, पण त्यांचे जे पुण्यात स्थाईक आमच्यासारखे रिटायर्ड आई वडील आहेत त्याना त्यांच्या ‘पुणेरी स्वप्नाचा’ पाठपुरावा करायलाही आधार देतात.

जेव्हा दोन्ही बाजूंची स्वप्नं एकमेकाला पूरक अथवा तारक असतात तेव्हा सगळ्यात उत्तम दृश्य, म्हणजे सलोख्याचं दृश्य दिसतं, प्रेमाच्या बंधनाचे दृश्य, जिथे देवाण घेवाण होते फक्त सहकार्याची.

कधीतरी बंडखोर अमेरिकास्थित तरूण पुण्याची सूत्रं पूर्णपणे आपल्या हातात घेऊ पहातात  पण पुणेरी पेचांपुढे ते टिकाव धरू शकत नाहीत आणि मग पुणेरी आई वडिल त्या अमेरिकन बंडखोरीला व्यवस्थित लगाम घालतात. पण हे क्वचित घडते.  शेवटी काय,  पिढ्यांन पिढ्यांचे पुणेरी संस्कारच अजिंक्य ठरतात, आणि प्रेम, आदर, क्षमा, शांती इत्यादी सात्विक गुणांसह जागतिक स्तरावरही भारतीय वंशाच्या कुटुंबांची नैतिक मूल्ये अबाधित राहतात.

बाळासाहेब चिटणिसांच्या घराचे  लागेबंधे असेच वॉशिंग्टन डी सी बरोबर बांधले गेलेत, वॉशिंग्टन डी सी मधे राहणाऱ्या हृदयरोग तज्ञ डॉक्टर विकासच्या घराशी.

पुण्याच्या बाळ उर्फ बाळासाहेब चिटणिसांचा मुलगा विकास. हा विकास लहानपणापासूनच फार हुशार. अगदी प्राथमिक शाळेपासून पहिला क्रमांक त्याने कधी सोडला नाही.

पुण्यातच शाळा कॉलेज पूर्ण करून विकास ने पुण्यालाच  बी जे वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवला आणि यथावकाश वैद्यकीय पदवी परीक्षा आणि पदव्यूत्तर प्राविण्यही त्याने मिळवले आणि मग भारतात फार दिवस न राहता विकासने सरळ अमेरिकेचा रस्ता धरला. तिथेही सर्व वैद्यकीय परीक्षा त्याने चांगल्या ग्रेडमधे पार केल्या आणि वॉशिंग्टन डी सी मधल्या एका प्रसिध्द रुग्णालयात विकासने हृदयरोग तज्ञ म्हणून नोकरीही मिळवली.

सगळं कसं छान झालं खरं, पण म्हणतात ना, प्रत्येक चांगल्या गोष्टीला काहीतरी किंमत मोजावी लागतेच. तसंच काहीसं विकासच्या बाबतीत घडलं. हे सगळं यश संपादन करता करता वयाची तीशी ओलांडून गेली, पण व्यवसायात घडी बसवण्याच्या प्रयत्नांत गुंतल्यामुळे विकासला प्रेम, विवाह वगैरे सर्वसाधारण गोष्टींचा विचार करायला वेळच मिळाला नाही.

वय वाढत चाललं. शेजारी पाजारी, नातेवाईक, सगळेच कधी आडून, कधी सरळ विचारायला लागले. काही जण मागे कुजबुजायला  लागले. पण  बाळासाहेब चिटणिसांकडे आणि रजनीताईंकडे समाधानकारक उत्तर नव्हतं.

विकास त्याच्या सवडीनुसार, बहुधा वीक एन्डला, घरी फोन करायचा. विकासचा फोन आला की बाळासाहेब फोन स्पीकरवर टाकायचे. रजनीताई आणि बाळासाहेब, दोघंही विकासशी बोलायचे. पण लग्नाचा विषय काढला की विकास स्पष्ट काही उत्तर द्यायचा नाही. आई बाबांना म्हणायचा,  ‘तुम्ही शोधून ठेवा. मी सुटी मिळाल्यावर येईन आणि मग उरकुन टाकू पटकन’.

बाळासाहेबानी आणि रजनीताईनी त्याप्रमाणे विकासला साजेशा  ३ - ४ मुली बघून ठेवल्या. पण झालं असं, की विकासला भारतात जाण्यासाठी कधी सुटी मिळालीच नाही, किंवा त्याने घेतली नाही, आणि तो कधी भारतात आलाच नाही. मुलींचे आईवडील मधुन मधुन फोन करायचे, विकासची चौकशी करायचे. शेवटी कंटाळून त्यांनी पण एक एक करून आपापल्या मुलींसाठी  दुसरी स्थळं बघितली आणि जमेल तशी लग्नंही लावून दिली.

बाळासाहेब आणि रजनीताई हताश झाले. आणि अचानक एक नवा मार्ग सापडला. बाळासाहेबांचा चुलतभाऊ मनोहर पुण्यात जवळच कोथरूडला रहात असे. बाळासाहेबांचा समवयस्क. दोघं भाऊ भाऊ भेटायचे एकमेकाना, किंवा गप्पा मारायला फोन करायचे अधुन मधुन.

असंच एकदा फोनवर गप्पा मारता मारता बाळासाहेबांनी विकासच्या लग्नाबाबतची व्यथा मनोहरच्या कानावर घातली.  मनोहरने ऐकून घेतलं,

“बाळ, माझ्या मनात एक कल्पना आहे,” मनोहर म्हणाला, “या कल्पनेचा विचार तुम्ही जरूर करावा. असं करा  उद्या रविवार आहे. संध्याकाळी पाच वाजता या तुम्ही दोघं. बऱ्याच दिवसात भेटलो नाही आपण. गप्पा मारू.  आणि बाळ, गाडी

नको आणूस.ऑटो घेऊन ये, म्हणजे मग जरा आरामात बसता येईल, काय आलं का लक्षात ?"

बाळासाहेबांच्या लक्षात आलं आणि त्यांनी शेजारीच बसलेल्या रजनीकडे एक चोरटा कटाक्ष टाकला. रजनीताईनी न ऐकताही भावजीनी काय सुचवले असेल ते जाणलं आणि तोंड वाकडं केलं.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पाच सव्वा पाच पर्यंत बाळासाहेब आणि रजनीताई ऑटो रिक्शातून कोथरूडला मनोहर चिटणीसांकडे पोहोचले. मनोहर आणि सौ रमा वाटच पहात होते. मंडळी बसली. गप्पा गोष्टी झाल्या. थोडं खाणंही झालं.

"आत्ताच उगीच पोट भरून टाकायला नको". मनोहरने एक सूचक वाक्य टाकलं. रजनीताईनी आणि रमाने एकमेकींकडे पाहिलं.

"बरं, मनोहर, तुझ्याकडे काय कल्पना आहे विकासच्या लग्नाबद्दल ?" बाळासाहेबानी विचारलं.

"हं, सांगतो". मनोहर म्हणाला. "असं पहा बाळ, मुली बघायला विकासला इथे यायला जमत नसेल ना, तर एक उपाय आहे. तू एक काम कर. अमेरिकेत राहणाऱ्या, विकासला साजेशा, कोणी मुली आहेत का ते पहा. मग एखाद्या वीक एन्डला तिथल्या तिथे जायला, मुलीला भेटायला विकासला सहज जमेल आणि कुणी सांगावं, गोळी बरोबर निशाणावर लागेलही."

बाळासाहेब म्हणाले, "अरे मन्या, इकडे भारतात विकासला सुयोग्य मुली शोधता शोधता आमच्या नाकी नव आले, आणि अमेरिकेतल्या मुली इथे बसून शोधायला तू मला सांगतोयस ! कसं शक्य आहे हे. आणि आता बत्तीस वय आहे त्याचं. वयानीही मुली अनुरूप असायला हव्यात नं त्याला?"

"हे बघ बाळ", मनोहर म्हणाला. "आठ दहा अनुरूप मुली मिळणं अवघड आहे, पण सध्या अमेरिकेत राहणारी एक परफेक्टली अनुरूप मुलगी मला माहीत

आहे. डॉक्टर आहे ती.” बाळासाहेबांची उत्सुकता जागृत झाली. “कोण आहे मुलगी ? तुझ्या माहितीची आहे का ?” बाळासाहेबांनी विचारलं.

“सांगतो, सर्व सांगतो”. मनोहर म्हणाला, “अरे आपली आत्तेबहीण आहे नं, मंगला. लग्नानंतर अमेरिकेला मायग्रेट झाली बघ. ही अनुरूप मुलगी म्हणजे तिच्या नवऱ्याची, रविराजची पुतणी. अमेरिकेतच जन्मलेली आणि वाढलेली. डॉक्टरही तिथल्याच मेडिकल स्कूल मधून झाली गेल्या वर्षी. तिथे न्यू जर्सीला मंगलाकडेच राहते आणि जवळच्याच हॉस्पिटलमधे इंन्टर्नशिप करते आहे म्हणे. वय अठ्ठावीस.”

“अरे वा! अगदी छत्तीस गुण जमतायत की” ! बाळासाहेब उद्गारले. “पण दिसायला बरी आहे नं? हो, तेही पहायला पाहिजे”.

“चांगली आहे दिसायला”, मनोहर म्हणाला. “एक फॅमिली फोटो पाठवलाय मंगलाने. तो फॉरवर्ड करतो मी, तुला कल्पना येईल त्यावरून.”

मनोहरने लगेच फॅमिली फोटो पाठवला. बाळासाहेबांनी आणि रजनीताईनीही फोटो बघितला. अगदी झूम करून वरून खाली पाहिला.

“मुलगी नक्षत्रासारखी सुंदर दिसते की हो”! रजनीताईनी आपली पसंती दर्शवली. “विकासला दाखवूया, मुलीचं रूप बघून वेडाच होऊन जाईल”.

“अगं सबूरीने जरा,” बाळासाहेब म्हणाले. “मंगलाशी बोलून, तिचं, त्या मुलीचं मत घेतलं पाहिजे. अगं त्या मुलीचं नावही माहित नाही आपल्याला. आई वडील आहेत की नाही, फॅमिलीची पार्श्वभूमी काय आहे वगैरे सगळी चौकशी केली पाहिजे.”

रजनीताईना सर्व पटलं.

“विकासशी बोलून बघतो, काय त्याचं म्हणणं आहे ते”. इतके बोलून बाळासाहेबांनी विषय संपवला.

मनोहर खुर्चीवरून उठला, ग्लासेस, सोडा, लेडीज साठी सॉफ्ट ड्रिन्क वगैरे तयारीला लागला.

दुसऱ्याच दिवशी न्यू जर्सीला मंगलाशी फोनवरून संपर्क साधला गेला. बाळासाहेब बोलले. रजनीताई बोलल्या. मुद्द्याच्या विषयावर गप्पा झाल्या. अवांतर विषयांवरही बऱ्याच गप्पा झाल्या.

मंगला म्हणाली, "आमच्या प्रतिमाबद्दल विचारताय का तुम्ही ? अहो अगदी खणखणीत बंदा रुपया आहे आमची प्रतिमा. डॉक्टर आहे, गुणी आहे, बोटं दाखवायला जागाच नाही मिळणार कुणाला. पण आता वय वाढत चाललंय. अठ्ठावीस झालंय. लवकर उजवायला पाहिजे तिला. आहे का एखादं अनुरूप स्थळ तुमच्या पहाण्यात ?"

बाळासाहेबांच्या स्वत:च्या मुलाचंच स्थळ आहे म्हटल्यावर मंगला हरखलीच. तिने नवऱ्याला, रविराजलाही संभाषणात ओढले. माहितीची देवाण घेवाण झाली. दोन्ही बाजूंना एकमेकाची स्थळं अगदी टेलर मेड, फिट वाटली. अगदी सगळ्या अपेक्षा पूर्ण होत होत्या. इकडे बाळासाहेबांनी, रजनीताईनी, आणि तिकडे मंगला आणि रविराजने समाधानाचा सुस्कारा सोडला.

आता इथून पुढे कसं जायचं ! पहिली पायरी म्हणजे दोघांच्या कानावर ही माहिती घालायची आणि एकमेकाना भेटायला दोघांनाही उद्युक्त करायचं. दोघांचेही आपापले बिझी शेड्यूल, दोघांची मनाची धारणा वेगळी वेगळी. वयाप्रमाणे समज आलेली, किंबहुना जरा जास्तच. काळजीपूर्वक पुढे जायला हवं हे सगळेच जाणून होते.

## प्रकरण २

पुढे कसं जायचं याबद्दल इकडे बाळासाहेब- रजनी आणि तिकडे मंगला आणि रविराजने आपसात बराच विचार केला. सर्वांच्याच लक्षात आलं की इथे लपवा छपवीचं काही काम नाही. सगळं जे आहे ते दोघां मुलांच्या कानावर घालायचं आणि आपली भूमिका फक्त मार्गदर्शकाची ठेवायची.

शनिवार आला. पुण्यात शनिवारची संध्याकाळ, म्हणजे विकास कडे, वॉशिंग्टनला शनिवारची सकाळ. विकासचा फोन आला. 'आई बाबा कसे आहात तुम्ही', वगैरे औपचारिक चौकशी झाली.  मग उगीचच फुटकळ बोलणं सुरू होण्याआधीच रजनीने महत्त्वाच्या विषयाला हात घातला.

"हे बघ बाळा", रजनीताई म्हणाल्या, "एक चांगली मुलगी सांगून आली आहे. डॉक्टर आहे आणि तिकडे अमेरिकेतच न्यू जर्सीला राहते."

"बरं मग" ? विकासचा  आपल्याला त्यात गम्य नसल्यासारखा प्रश्न.

"अरे, मग काय ?" रजनीताई जरा चिडूनच म्हणाल्या. "वय अठ्ठावीस आहे. तुला अगदी साजेशी आहे."

आणि मग मुली बद्दलची सर्व माहिती रजनीताईनी विकासच्या कानावर घातली.

विकास गप्पच.

"बरं का विकास",  रजनीताई थोडं थांबून पुढे म्हणाल्या, "मंगला आत्याला मी तुझा नंबर  दिलाय. ती फोन करीलच तुला. मग तू आणि ती मुलगी, प्रतिमा, कुठे, कधी भेटायचं ते ठरवा. मला वाटतं विकास, तू एकदा मुलीला नक्की भेटावंस. आम्हाला तर आवडली आहे, पण फायनल होकार किंवा नकार तुझ्याचकडून येणार."

"ठीक आहे, चालेल". विकासची प्रतिक्रिया.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी रजनीताईनी विकासला परत फोन केला.

"हो आई, मंगला आत्याचा काल संध्याकाळी फोन आला होता. मी म्हटलं तिला, बघुया, येत्या महिन्यात मारावी म्हणतो एक न्यू जर्सी ची ट्रिप. जमवायला तर पाहिजेच." विकास म्हणाला.

जेव्हढ्यास तेव्हढेच. फारसा उत्साह दिसला नाही, निदान दाखवला तरी नाही.

पार्श्वभूमीला बराच आवाज येत होता. रजनीताईनी विचारलं, "विकास, कुठे बाहेर आहेस काय? मागे बराच आवाज येतोय."

"हो आई, पार्कमध्ये पिकनिकला आलोयत आम्ही. चांगला सनी डे आहे." विकास म्हणाला.

न राहवून रजनीताईनी विचारलं, "आम्ही म्हणजे कोण" ?

"माझे कलीग्ज आहेत आई, म्हणजे  डॉक्टर कपल, रवि आणि त्याची वाइफ आहेत. आणि सिस्टर रूथ आहे. तिचं स्टूडिओ अपार्टमेंट आहे हॉस्पिटल जवळच. मीच पिक अप केलं तिला येता येता.  आता ठेवू मी फोन आई, पुढच्या वीक एन्डला फोन करीन". विकास म्हणाला आणि फोन डिस्कनेक्ट केला.

पुढच्या वीक एन्डला बऱ्याच उशीरापर्यंत वाट पाहिली. विकासचा फोन काही आला नाही. न राहवून रविवारी रात्री रजनीताईनी  विकासला फोन लावला.

"हां आई, कशी आहेस तू ?" विकासचा एकदम नॉर्मल आवाज आणि अगदी नॉर्मल  सलामीचं वाक्य. रजनीताईंच्या जीवात जीव आला.

"मंगला आत्याकडची काही डेव्हलपमेंट आहे का ?" रजनीने सरळच प्रश्न विचारला.

"हो हो आई, पुढचा वीक एन्ड लॉन्ग वीक एन्ड आहे. शनिवारी मी न्यू जर्सीला जाणार आहे इथून उण्या पुऱ्या तीन तासांचा ड्राईव्ह आहे. प्रतिमाशीही मी फोनवर बोललो. जरा शाय वाटली ती. तिलाच विचारलं मी, कुठे भेटायचं म्हणून,

एखादं शांत रेस्टॉरंट सुचव, म्हटलं. मग प्रतिमाने एक रेस्टॉरंट सुचवलंय एन जे मधेच. तिथे लंच टाईमला भेटू, लंच घेऊ. दुपारपर्यंत प्रतिमा जाईल घरी. तिची कार आहे. त्यामुळे. घरापर्यंत पोचवायचा वगैरे प्रश्न नाही. नंतर मी जाणार आहे माझ्या मित्राकडे, आपला पुण्याचा राजू काटकर गं, मॉडर्नचा माझा स्कूल मेट. सायकिआट्रिस्ट आहे तो. एन जे मध्येच प्रॅक्टिस करतोय. बरेच दिवस झाले बोलावतोय मला. त्याच्याकडेच रात्री रहायचंय, मग रविवारी लंच नंतर डी सी ला येईन परत मी, ड्राइव्ह करून".

"ठीक, ठीक", रजनी म्हणाली. 'प्रतिमाला भेटायला खरंतर जास्तीत जास्त वेळ ठेवायला पाहिजे होता त्या राजू काटकरला भेटायचं कशाला ठेवलं यांनी' असे विचार रजनीताईंच्या मनात येत होते. पण तरीसुध्दा, काहीतरी घडतंय म्हणून त्याना बरं वाटलं.

दुसरा दिवस उजाडला. रजनीताईनी मंगलाला फोन लावला.

"हो, झालं बोलणं दोघांचं." मंगला म्हणाली. "आमची प्रतिमा जरा लाजाळू आहे हो. काही दाखवत नाही चेहऱ्यावर, पण मनातनं हरखलीय. 'डेटवर जायचंय, डेटवर जायचंय' असं पुटपुटतेय स्वत:शी. बहुतेक मनाची तयारी करत असावी".

दोघीही हसल्या.

"मंगला, लग्न पुण्यालाच करू या, नं?" रजनीताईनी विचारलं. "नाही, म्हणजे इथली मंगलकार्यालयं अगदी सुसज्ज असतात. कार्य व्यवस्थित करायची पूर्ण जबाबदारी घेतात, आणि अगदी फाईव स्टार गेस्ट रूम पण असतात त्यांच्याकडे."

"अगं रजनी, न्यू जर्सीलाही सगळी सोय आहे, पुण्याच्या तोडीस तोड." मंगला म्हणाली. "कदाचित खर्च जरा जास्त असेल म्हणा, पण त्याची तू नको काळजी करू. ते आम्ही बघून घेऊ".

"बरं बरं". रजनीताई हसून म्हणाल्या, "बघुया, एकदा गंगेत घोडं नहालं म्हणजे जिंकलं."

अशा खेळीमेळी च्या वातावरणात गप्पा संपल्या.

पुढचा वीक एन्ड आला.

त्या सकाळी, वीक एन्ड शेड्यूल प्रमाणे झोपून न राहता विकास लवकरच उठला. प्रातर्विधी, शॉवर वगैरे झटपट उरकून विकास निघायला तयार झाला.

प्रतिमाने "सनी हायवे कॅफे, रॅम्बलवूड न्यू जर्सी" इथे भेटायचं असा मेसेज पाठवला होता. नावावरून हा चायनिज कॅफे असावा असं विकासला वाटलं खरं, पण प्रतिमाकडून खातरजमा करून घेतली गेली नव्हती.

हा पत्ता विकासने गूगल मॅपमधे सेट केला, एक ओव्हरनाइट रहाण्याच्या जरूरी गोष्टींची बॅग गाडीत टाकली. विकास निघाला. नऊपर्यंत त्याची गाडी बाल्टीमोर पार्कवेला लागली सुध्दा.

गूगल मॅपवर सर्व रस्ता निळ्या रंगाने दाखवला गेला होता.

पुढे बाल्टीमोर बायपास, हायवे ८९५, एक्सप्रेस हायवे ९५ वरुन विकास जॉन एफ केनेडी मेमोरिअल हायवे मार्गे सुमारे साडे अकरा पर्यंत डेलावेअर टर्न पाइकला लागला. पुढे होता डेलावेअर मेमोरिअल ब्रिज आणि नंतर घ्यायचा न्यू जर्सी टर्न पाईक. बहुतेक सगळे टोल रस्ते.

डेलावेअर मेमोरिअल ब्रिजवर पुढे जाण्याआधी विकासने फूड कोर्टला गाडी वळवली. गाडी पार्क तर केली खरी, पण एकट्याने बसून काही खायचा मूड होईना. मग रेस्ट रूम मधे फ्रेश झाल्यानंतर विकासने एक रेग्यूलर गरम कापुचिनो ऑर्डर केली. कॅाफीचा ग्लास हातात आल्यावर विकास बाहेर पडला. गाडीच्या डॅशबोर्ड जवळच्या ग्लासच्या गोल खाच्यात ग्लास ठेवला आणि न्यू जर्सी टर्न पाईक मार्गे गाडीचा मोर्चा न्यू जर्सीकडे वळवला.

कॉफीचे घुटके घेत, ट्रॅफिक प्रमाणे स्पीड ठेवून प्रवास चालला होता.

रॅम्बलवूड भागात गाडी आल्याचे मॅपने जाहीर केले. आणि हो, तिथे कोपऱ्यावर सनी हायवे कॅफेची पाटी दिसली. प्रतिमेने सुचवलेला हाच तो कॅफे.

दुपारचे साडेबारा वाजले होते. ब्रेकफास्ट केव्हाच पचनी गेला होता, कापुचीनो कॉफीचीही तशीच वाट लागली होती. पोटातले कावळे जागे होत होते. गाडी पार्क करून विकास उतरला.

कॅफेचा दर्शनी भाग निरूत्साहीच वाटला. आत फारशी गर्दी नव्हती. एका रिकाम्या टेबलावर बसलेली मुलगी प्रतिमा असणार हे लक्षात येणं विकासला फारसं अवघड गेलं नाही.

पुढे जाऊन विकास ने आपली ओळख करून दिली. प्रतिमा उभी राहिली.

“रूथ एव्हढी उंच नाही ही”, सहजच विकासच्या मनात विचार आला.

प्रतिमाने हसून हॅलो म्हटलं. विकास तिच्या समोरची खुर्ची ओढून बसला.

“इंडियन फूडस् चं हॉटेल दिसतंय.” विकास इकडे तिकडे पहात म्हणाला.

“हो, म्हणजे झालं काय, तुम्हाला कुठल्या टाइपचं फूड आवडेल हे विचारायचे राहून गेलं. पण म्हटलं, तुम्हाला बहुतेक भारतीय फूड जास्त आवडत असेल. म्हणून मी हे हॉटेल सिलेक्ट केलं”.

“ठीक आहे, पण हे दक्षिण भारतीय स्नॅक्स चं रेस्टॉरंट दिसतंय. खरं तर मला चायनीज फूड आवडतं किंवा इटालियन”. विकास म्हणाला.

“मला थाई फूड आवडतं”. प्रतिमा म्हणाली.

‘चला, टोटल मिसफायर. प्रथम ग्रासे मक्षिकापात.’ विकास मनात म्हणाला. रूथची आणि त्याची फूडची आवड कशी, जमत होती एकमेकांशी.

काही थातुर मातुर स्नॅक्स ऑर्डर केल्या गेल्या आणि आता पुढची खेळी.

"तू गायनॅक प्रॅक्टिस करतेस का ?" विकासने विचारले.

"हो इथे जवळच क्वीन्स हॉस्पिटलमधे मी गायनॅकोलॉजी आणि ऑब्सटेट्रिक्स डिपार्टमेंटला इंटर्न आहे". प्रतिमाने उत्तर दिले.

विकास पडला हार्ट स्पेशालिस्ट, हृदयरोग तज्ञ. गायनॅकशी कुठलाही कॉमन पॉइंट नाही.

स्नॅक्स आल्या, थोडाफार समाचार घेतला गेला. सांभार तिखट लागलं.

"मेडिकल प्रॅक्टिसबरोबर काही हॉबीज वगैरेही असतील नं? फावला वेळ कसा घालवतेस ? ट्रेकिंग, स्वीमिंग वगैरे ?" विकासचा कॉमन ग्राउंड शोधायचा प्रयत्न.

"मी स्कलप्चर्स करते. शिल्पकलेची आवड आहे मला, बस्ट. छोटा स्टुडिओ शेअर करते मी. आता वेळ असेल तर जाऊ शकतो आपण बघायला." प्रतिमा म्हणाली.

"आज नको, नंतर बघू कधीतरी." घाई घाईने विकासने सुटका करून घेतली.

'रूथला कसं ट्रेकिंग, ट्रॅव्हलिंग आवडतं, आपला आउटडोअर ॲक्टिव्हिटीजचा ग्रुप कसा छान जमलाय तिकडे !' विकासच्या मनात विचार.

पुढचा अर्धा तास असाच कॉमन ग्राउंड शोधण्यात गेला. दोन तारू अथांग सागरात नुसतेच सैरभैर भरकटत होते.

स्नॅक्स झाल्यावर तोंड गोड करायला गुलाबजाम मागवले गेले. ते मात्र उत्कृष्ट आहेत यावर एकमत झालं. "चला, काहीतरी कॉमन ग्राउंड सापडली", असं म्हणत प्रतिमा खळखळून हसली. तिचं ते मोकळं हसणं विकासला फार आवडलं. अगदी टक लावून बघत बसावं असं वाटलं. 'रूथला असं खळखळून हसता नाही येत', त्याच्या मनात विचार आला.

प्रतिमाने घड्याळ पाहिलं. “काकींना फराळाचं करायला मदत करायचीय, जायला पाहिजे. तू येणार का काकीना हलो म्हणायला”? प्रतिमाने विचारलं.

विकास हो नाही म्हणणार तेव्हढ्यात राजू काटकरचा फोन आला, “अरे विकास, कुठे आहेस तू? इथे एक सरप्राइज आहे तुझ्यासाठी. केंव्हा येतोयस ? लवकर ये जमेल तेवढं.”

“आत्याकडे परत कधीतरी जाऊ. डॉक्टर काटकरांकडे जायला पाहिजे आता.” असे बोलून विकासने मीटिंग संपवली.

नाहीतरी मीटिंग कंटाळवाण्या वाटेनेच चालली होती. दोघांनाही कुठलीच समाईक जागा सापडत नव्हती आणि पुढे जाण्यात स्वारस्यही वाटत नव्हतं. त्यामुळे राजू काटकरचा फोन हे एक चांगलंच निमित्त मिळालं.

राजूकडे जाताना विकास विचार करत होता , ‘रूथशी बोलायला कसे आपल्याला विषय शोधावे लागत नाहीत! संभाषणाचा ओघ थांबतां थांबत नाही, आणि या मुलीचं वेगळेच काम. खरं तर दोघीही अमेरिकन. दोघी इथेच जन्मल्या, शिकल्या, वाढल्या. मग एव्हढा फरक कसा ?’

राजू काटकरने आणखी दोन स्कूल मेट्सना बोलावलं होतं, जुन्या आठवणी निघाल्या, मनसोक्त खाणे पिणे झाले आणि अगदी ठरवल्याबरहुकूम आणि आखलेल्या वेळापत्रका प्रमाणे सर्व घडामोडी पार पडल्या. भरगच्च आणि धावपळीच्या वीक एन्ड नंतर विकास डी सी ला परत आला आणि पुन्हा कामात गुंतून गेला, आणि त्यामुळे रजनीताईना विकास - प्रतिमा भेटीचा अनौपचारिक अहवाल मिळूच शकला नाही. विकास कधी मधी फोन करून साद्यंत हकीकत कळवेल अशी अपेक्षा ठेवण्यातही अर्थ नव्हता.

मंगळवारी मंगलाचा फोन आला.

"भेटले बरं दोघं. पण काही डीटेल कळले नाहीत मला. आमची प्रतिमा लाजाळू आणि विकासही तेवढा बोलका नसावा असं वाटतंय. दोघंही उत्सुक असावेत भेटायला, पण या वाढलेल्या वयात टीन एजर सारखा थिल्लरपणा करायचीही लाज वाटत असेल." मंगला म्हणाली.

"मंगल , आमच्यापेक्षा तुम्ही तिकडे या मुलांच्या जवळ आहात. दोघांचीही मनं दुसरीकडे गुंतली असण्याची शक्यता नाही नं ! नाही, आपली एक पाल चुकचुकुन गेली मनात". रजनीताई बोलून गेल्या, पण मंगलाकडेही काही ठाम उत्तर नव्हतं आणि हा प्रश्न असाच अनुत्तरित राहिला.

एक आठवडा गेला, दुसराही गेला. महिना गेला. इकडे विकासकडून केवळ उडवा उडवीचीच उत्तरे मिळत राहिली. कदाचित काही सांगण्यासारखं नसेल त्याच्याकडे.

महिना गेल्यावर मात्र रजनीताईना राहवेना. वीक एन्डला रजनीताईनी विकासला फोन केला.

"बरं का विकास, तुझ्या आणि प्रतिमाच्या न्यू जर्सीच्या भेटीबद्दल बोलतेय मी. अरे, कसल्या गप्पा झाल्या तुमच्या ? काही कॉमन टॉपिक सापडले का बोलायला ? तुमच्या व्यवसायाबद्दल, खेळ, म्यूजिक,पेंटिंग, जागतिक घडामोडी, नातेवाईक, फ्रेंड्स,"

"आई, जरा प्रॉब्लेमच झाला. आमच्या मेडिकल लाईन्स अगदी भिन्न, माझी कार्डिओलॉजी, हृदयाशी संबंधित. ती गायनेकॉलॉजिस्ट, प्रसुती आणि स्त्री रोग. मित्रमंडळाबद्दल बोलायचे तर, आम्हाला ना शाळा कॉलेज मधले ना व्यावसायिक, कोणी कॉमन फ्रेंड नाहीत, कॉमन नातेवाईक नाहीत. ती शिल्पकलेत पारंगत आहे म्हणाली आणि त्याबद्दल काही सांगायचे होतं तिला. मला तर काहीच समजलं नाही. दुपारची वेळ, भूक लागलेली आणि तिने कॉफी हाऊस शोधून

काढलं. तिथे फक्त स्नॅक फूड. फारच पंचाईत झाली. या सगळ्या प्रॉब्लेम मुळे काही फारसं बोलणं नाही झालं. मुलगी चांगली असेलही आई पण काही जमलं नाही”. विकास म्हणाला.

रजनीताईंच्या लक्षात आलं. तासाभराच्या भेटीतून जीवनाचा जोड़ीदार शोधणं शक्य नव्हतं. हा एक जिव्हाळ्याचा कौटुंबिक विषय आहे. अगदीच चुकीच्या प्रकारे तो हाताळला गेला होता. जोडीदाराबरोबर नैतिक, मानसिक, भावनिक समाईकता पहाण्याचा प्रयत्नच झाला नव्हता. आणि विकासची तरी काय चूक म्हणा. याबाबतीत त्याला कोणी गाईडच केलं नव्हतं. ठीक आहे, अजूनही चूक सुधारणं शक्य होतं.

रजनीताई म्हणाल्या, “अरे विकास, पहिल्या भेटीत काही फारसं बोलणं झालं नसलं, तरी अगदीच नकारात्मक मत नाही नं, मग अरे परत एकदा भेटा तुम्ही, काही वावगे नाही त्यात.”

“बरोबर बोललीस आई. त्यादिवशी मी सकाळी उशीरा निघालो आणि अगदी लंच टाईमला एन जे ला पोहोचलो. संध्याकाळच्या काटकरला भेटण्याच्या कार्यक्रमातही अर्धं लक्ष होतं. शांतपणे भेटून चूक सुधारायला पाहिजे मला.” विकास म्हणाला. “प्रतिमाचा मोबाईल नंबर आहे माझ्याकडे. करीन मी फोन.”

पंधरा मिनिटात विकासचा फोन आला. “अगं आई, प्रतिमा आता न्यू जर्सीला नाही रहात. तिकडे लॉंग आयलंडच्या फॅसिलिटीमधे तिची नुकतीच बदली झालीय, सहा महिने ते एक वर्षासाठी. आई, हा नवाच प्रॉब्लेम आहे. इथून लॉंग आयलंड म्हणजे पाच एक तासांचा ड्राइव्ह आहे, आणि त्यातला बराचसा भाग न्यूयॉर्कच्या किचकट ट्रॅफिक मधून. आणि आई, इथल्या जवळच्या फिलाडेल्फियाच्या फॅसिलिटीमधे जाण्याचा तिला चॉईस दिला होता म्हणे, पण गायनॅकॉलॉजी प्रॅक्टिसचा चांगला अनुभव मिळायला तिने स्वतःच लॉन्ग

आयलंडचं हॉस्पिटल मागून घेतलं, असं ती सांगत होती. या पूर्ण महिन्यात आमच्या भेटीबद्दल तिनेही काही फॅालो अप केला नाही, आई.''

थोडे थांबून विकास पुढे म्हणाला, ''आई, इथे डी सी ला आम्ही कार्डियाक व्हाल्व रिप्लेसमेंटचं नवीन डिपार्टमेन्ट उघडतोय. सगळं नीट सेट अप होईपर्यंत जबाबदारी फार आहे. मला नाही जमायचं इतक्यात लॅान्ग आयलंडला ड्राइव्ह करून जायला. आता एवढ्यात एखादा सलग सुटीचा लॅांग वीक एन्ड सुध्दा येणार नाही. मुलगी चांगली आहे गं आई, मॅटर मलाही पुढे न्यायची होती, पण मी तरी काय करू, तूच सांग.''

रजनीताई निरुत्तर झाल्या. त्या विचार करत होत्या की दोघांनाही करिअरच्या पुढे काहीच कसं दिसत नाही !

दुसऱ्या दिवशी रजनीताईनी मंगलाला फोन केला. मंगलाला ही सर्व घडामोड माहिती होती आणि तीही कपाळाला हात लावून बसली होती.

''जसं नियतीच्या मनात असेल तसं घडेल, दुसरं काय!'' मंगला म्हणाली.

दिवस जात होते. दर वीक एन्डला येणारा फोन आता जरा अनियमितपणेच येऊ लागला होता.

''त्या नव्या डिपार्टमेंटचं काम असेल नं डोक्यावर !'' रजनीताई म्हणाल्या. ''इथे फोन नाही झाला तर राहू दे, पण चार घास पोटात घालायला तरी पोराला वेळ मिळतोय की नाही कोण जाणे.''

कधी मधी वीक एन्डस् ना यायचा विकासचा फोन पण त्याचं जे 'हं, हं' चालायचं, तुटक बोलणं चालायचं , त्यावरून शंका यायची की याचं आपल्या बोलण्याकडे लक्ष आहे की नाही !

असाच एका रविवारी संध्याकाळी रजनीताईंनी विकासला फोन लावला. तिकडे वॅाशिंग्टनमधे विकासचा रविवारचा दुपारचा एक वाजत आला असावा.

जरासं साधं, इकडचं, तिकडचंच बोलणं झालं. बाळासाहेबांनी विचारपूस केली. मग रजनीताई बोलल्या, शेवटी बोलायला विषयच सापडेनात.

"बरं विकास, ठेवते आता, जेवलास का? टी व्ही बघतोयस वाटतं. बाईच्या डायलॉगचा आवाज येतोय." रजनीताईनी आपलं सहजच विचारलं.

"टी व्ही नाही आई, ही रूथ आली आहे होम मेड ॲपल पाय घेऊन. इथे बारबेक्यूसाठी ग्रिल लावलंय. ती मला विचारतेय काही तरी. आई फोन ठेवतो मी". इतके बोलून विकासने फोन डिस्कनेक्ट केला.

प्रतिमा गेली, अन् रूथ आली की काय ??

रजनीताई जरा हबकल्याच, पण जास्त विचार करायचं त्यांनी सोडलं आणि त्या आपल्या डायनिंग टेबलवरच्या आवरा आवरीच्या कामाला लागल्या. रात्री स्वप्नात मात्र रूथ नावाचा पांढरा फटक चेहरा अधुन मधून त्याना त्रस्त करत होता.

## प्रकरण ३

आणि एक दिवस रजनीताईंना ज्या गोष्टीची सुप्त भीती वाटत होती तेच झालं. विकासचा फोन आला. “आई, मी आणि रूथ लग्न करतोय. चर्च वेडिंग आणि मग रजिस्ट्रेशन. नंतर कधीतरी पुण्याला येऊ तेंव्हा यथासांग, साग्र संगीत भारतीय वेडिंग करू.” विकास म्हणाला.

बाळासाहेबांच्या आणि रजनीताईंच्या लक्षात आलं की विकास परवानगी मागत नव्हता. फक्त संमती अपेक्षित होती.

“आम्ही आजच रजिस्ट्रारला नोटीस देऊन आलो. बरोबर एक महिन्यानी लग्न. आई, बाबा तुम्ही येऊ शकाल का लग्नाला ? बघा. येऊ शकाल तर मजा येईल.” विकास विचारत होता.

बाळासाहेबांनी आणि रजनीताईंनी एकमेकांकडे पाहिलं आणि पुढच्याच क्षणी नकारार्थी उत्तर दिलं.

महिन्या नंतर विकासचं लग्न झालं. चर्च मॅरेज आणि रजिस्ट्रेशन. रूथचे आई बाबा शिकागोहून दोन दिवसांसाठी येऊन गेले. हॉस्पिटलमधल्या सहाध्यायी डॉक्टर आणि सिनिअर पॅरा मेडिकल स्टाफ साठी तिथेच एक छोटं रिसेप्शन केलं. मग एक आठवडाभर विकास आणि रूथ हनिमूनसाठी कॅरीबीअन क्रूझला गेले.

.

आई बाबाना विकासने फोटो पाठवले. लग्नाचे पाठवले. क्रूझवरचे पाठवले. बाळासाहेबानी आणि रजनीताईंनी त्यांच्या हातात होतं तेवढं केलं. फोटो बघून समाधान व्यक्त केलं आणि उभयतांना इथूनच आशिर्वाद पाठवले.

विकासचा दर वीक एन्डला फोन येत असे. रूथ सुध्दा कधी कधी तिच्या अगम्य भाषेत बोलत असे. रजनीताई आपल्या ‘हं, हं’ करत असत, ती हसली की साथ देत असत.

दिवस जात होते. अधुन मधुन वीक एन्ड, लॉंग वीक एन्ड बघून विकास आणि रूथ बाहेर ट्रिपला जायचे. आईबाबाना आवर्जून विकास फोटो पाठवायचा. बाळासाहेबाना बरं वाटायचं, किंबहुना ते फोटो आय पॅड मधल्या वेगळ्या आल्बम मधे साठवून ठेवणे, मधुन मधुन उघडून पहाणे हा त्यांचा एक विरंगूळाच झाला होता.

आणि मग एक दिवस विकासचा फोन आला. “बाबा, रूथ एक्सपेक्टिंग आहे.” थोडं थांबून विकास पुढे म्हणाला, “टेस्ट केली बाबा, जुळं आहे”.

“पहिल्याच खेपेला जुळं म्हणजे अगदी डबल बार !” बाळासाहेबांनी नंतर विनोद केला.

रजनीताईनी फुटकळ विनोदाकडे दुर्लक्ष केलं. त्यांच्या मनात दुसरेच विचार घोळत होते. ‘सूनबाईच्या बाळंतपणासाठी आपल्याला तिकडे जावं लागेल की काय ? की तिची आई येऊन राहील काही दिवस ! तिकडे कशी, काय पध्दत आहे हे नक्की माहिती नव्हतं. आणि नंतर ……. नंतरचं काय. नवजात मुलांच्या संगोपनासाठी काही मदत लागेल का !’ निरनिराळे विचार. ठोस उत्तर नाही.

एक दोन महिने गेले. एका वीक एन्डला विकास म्हणाला, “आई, बाबा, रूथची डिलिवरी आता महिन्या दोन महिन्यावर आली. डिलिवरीच्या सुमारास रूथची आई येणार आहे आणि नंतर एक दोन महिने ती राहील आमच्याकडे. प्रश्न आहे त्या नंतरचा. दिवसाला, रात्रीला हेल्पर लेडीज असतील, त्या करतील मुलांचं सगळं, ट्रेनिंग घेतलेल्या असतात त्या. आम्हा दोघांचे जॉब असे, हॉस्पिटल मधले. इमर्जन्सी कधीही येऊ शकते आणि सगळं सोडून तातडीने जावं लागतं. अशा वेळी त्या हेल्पर लेडीजवरच सगळी भिस्त ठेवावी लागेल. आणि मुलं जरा मोठी झाल्यावर डे केअर मधे पाठवू त्याना”.

यथावकाश अमेरिकेहून गुड न्यूज आली. जुळं जन्माला आलं. नैसर्गिक डिलिव्हरी. दोन्ही मुलगे. एक राजेश. राज. आणि दुसरा विक्रम. व्हिकी. रूथच्या आई जेसिका बाई विकासकडे येऊन राहिल्या. डिलिव्हरी नंतर पंधरा दिवसांतच रूथ कामावर रुजूही झाली.

पुण्यामधे बाळासाहेबांनी नातेवाईकांना, जवळच्या मित्रमंडळीना पेढे वाटले.

रूथच्या आईने, जेसिकाने मुलांचा चार्ज घेतला. दिवस रात्र अनुभवी अटेन्डन्ट बायका होत्या. मुलांना दुध पाजण्याची जबाबदारी, त्याना पोषक आहार देण्याची जबाबदारी सर्वांच्या सहकार्याने बिनबोभाट पार पाडली जात असे. मुलांच्या आंघोळी, त्यांची स्वच्छता वगैरे व्यवस्थित पाहिलं जायचं.

दोन महिन्यानंतर, सगळं बऱ्याच प्रमाणात स्थीरस्थावर झालंय असं पाहून जेसिका शिकागोला, स्वगृही निघून गेली.

दिवस बरे चालले होते. मुलं मोठी होत होती. हवा चांगली असेल तेव्हा विकास आणि रूथ मुलांना आउटिंगला घेऊन जात असत. विकासने मोठं घर घेतलं. नाहीतरी या अडखळत चालण्याचा प्रयत्न करणाऱ्या मुलांसाठी आधीची जागा अपुरीच पडत होती.

मुलांच्या पहिल्या वाढदिवसाला विकासने त्याचे हॉस्पिटलमधले जवळचे सहाध्यायी छोट्या पार्टीसाठी बोलावले होते. काही जणांची राज आणि व्हिकीच्या आसपासच्या वयाचीच छोटी मुलं होती. हवा छान होती त्यामुळे मागच्या लॉनवरच पार्टी केली. बाहेरून मागवलेल्या भारतीय खाद्यपदार्थांची रेलचेल होती. विकासने फोटो पाठवले होते. सर्वचजण आनंदात, मजेत पार्टी एन्जॉय करताना दिसत होते.

मुलांच्या वाढदिवसांनंतर जेमतेम दोन महिने गेले असतील. त्यातले काही वीक एन्डस् विकासचा फोन आल्याविना कोरडेच गेले होते. बाळासाहेबाना आणि रजनीताईना चुकल्या चुकल्या सारखं वाटायचं खरं, पण इलाज नव्हता.

“अहो वीक डेज ना दोघं कामात बिझी असणार आणि वीक एन्डला घरी असल्यावर विकास आणि रूथला मुलं सतत बिझी ठेवत असणार. इकडे फोन करायला वेळच मिळत नसेल बिचाऱ्यांना.” रजनीताई विकासच्या बचावार्थी बाळासाहेबाना सांगत होत्या.

फोन आला. बऱ्याच दिवसांत रूथशी बोलणं झालं नव्हतं. त्यामुळे फोन संभाषणादरम्यान रजनीताई म्हणाल्या, “विकास, रूथशी बोलणं नाही झालं बऱ्याच दिवसांत. तिला बोलवतोस फोनवर?”

विकास म्हणाला, “आई, तुला सांगणार होतो, रूथ इथे नाही. ती शिकागोला गेली आहे महिन्यापूर्वी, आणि इकडे परत नाही येणार म्हणाली आहे. इथल्या हॉस्पिटलमधली नोकरी सुध्दा सोडून दिलीय तिने आणि शिकागोच्या हॉस्पिटलमधे जॉब घेतलाय.”

बाळासाहेबाना आणि रजनीताईना धक्काच बसला. थोडं सावरल्यावर रजनीताईनी विचारलं, “अरे पण मुलांचं काय ? मुलं घेऊन गेली आहे का ती बरोबर ? आणि परत नाही येणार म्हणजे काय? असं झालं तरी काय?”

“आई, गेले सहा महिने आमच्यात काही ना काही कुरबूर चालायची. आमचं बऱ्याच बाबतीत पटायचंच नाही. तिचं सगळं आयुष्य शिकागो मधे गेलंय, त्यामुळे इथे डी सी ला रहाण्यापेक्षा तिला शिकागोचीच ओढ जास्त आहे. मलाही तिकडे चलायला सांगत होती. पण आई, इथे माझा चांगला जम बसलाय. मी तिला स्वच्छ सांगितलं, इथली माझी प्रॅक्टिस, माझे पेशंट्स सगळं सोडून मी काही परक्या ठिकाणी येणार नाही. ती तिच्या विचारावर ठाम होती. मग तिने इथलं सोडून जाण्याचा निर्णय घेतला आणि ती गेली.”

"अरे पण मुलांचं काय ? त्याना घेऊन जायचं नाही म्हणाली ?" रजनीताईंनी विचारलं.

"आई, तिला पहिल्यापासून मुलांचा फारसा लळा नव्हताच. 'त्यांच्यात भारतीय गुण दिसतायत' असं म्हणायची ती. मी म्हणायचा की 'भारतीय गुण म्हणजे चांगले गुण'. मग त्यावरून पुन्हा आमचा वाद सुरू व्हायचा."

"मग आता बघतोय कोण मुलांकडे, की अशीच हेल्पर लेडीजच्या भंरवशावर सोडलीत?" बाळासाहेबांनी विचारलं.

"हेल्पर लेडीज तर आहेतच पण एक चांगली नॅनी मिळालीय फुल टाईम. बऱ्याच वयस्क आजी आहेत, प्रेमाने बघतायत मुलांकडे". विकासने उत्तर दिले.

"पण बाबा, आई, एक प्रॉब्लेम आलाय. रूथने डायव्होर्सचे पेपर टाकलेत. तिला सुटकाच पाहिजेय या लग्नातून. तेव्हा तिची भरपाईची मागणी तशी माफक आहे, तिला चांगला जॉब असल्यामुळे कोर्टाची दृष्टीही बदलते. प्रश्न आहे मुलांचा. मुलांकडे बघायला घरचं कोणी नसेल तर कोर्ट त्याना फॅास्टर होम मधे पाठवेल, म्हणजे कोणा भलत्याच लोकांच्या हवाली करतील त्याना." विकास म्हणाला.

सगळं ऐकून बाळासाहेब आणि रजनीताई हबकलेच.

"नाही, नाही, हे बरोबर नाही". रजनीताई ओरडल्या. "विकास, कोणीतरी चांगला वकील गाठ. आपल्याला यावर काहीतरी उपाय शोधलाच पाहिजे."

"तेच केलंय आई, वकील नेमलाय मी हे सगळं हाताळायला. त्यानेच उपाय सांगितलाय." विकास म्हणाला. "आई, बाबा, तुम्हा दोघांनाही इकडे यावं लागेल काही दिवस. तुमचा सध्या अस्थलांतरित व्हिसा आहे. त्यावरच तुम्ही इकडे या. नंतर आपण तुमचा स्थलांतरित व्हिसासाठी अर्ज टाकूया".

"अरे, पण आम्हाला इकडचं सगळं सोडून स्थलांतर नाही करायचं तिकडे". बाळासाहेब म्हणाले.

"अहो बाबा, हा ग्रीन कार्ड साठी अर्ज असणार आहे." विकास म्हणाला, "आता माझं पहा, मी इथला नागरिक आहे, तुम्ही माझे आई-वडील. मी तुम्हाला स्पोन्सर करू शकतो. माझी स्थिती भक्कम आहे आणि मुलांकडे बघायला कुटुंबाचे घटक या नात्याने तुमची इथे असण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे तुमचा अर्ज लवकर प्रोसेस होईल आणि तुम्हाला ग्रीन कार्ड म्हणजे स्थलांतरित व्हिसा मिळून जाईल. बरं ग्रीन कार्ड मिळाल्यावर इकडे कायम स्वरूपी स्थलांतर करायलाच हवं असं नाही. पुण्यातले घर, तिथले इतर व्यवहार, याना धक्का लागणार नाही. तुम्ही मनाला वाटेल त्याप्रमाणे भारतात येऊ जाऊ शकाल."

"हं, विचार करायला लागेल." बाळासाहेब म्हणाले.

बाळासाहेब आणि रजनीताई , दोघंही विचारात पडले. 'सगळं सोडून तिकडे जायचं, मित्रमंडळ, देवकार्य, सामाजिक कार्य, सगळं सगळं सोडून द्यायचं, आपलं पुणेरी स्वप्न बासनात बांधून ठेवायचं आणि वेगळेच जीवन सुरू करायचं !'

"विचार करायला वेळ नाही बाबा, "विकास म्हणाला, "आज एक तारीख आहे, दहा तारखेची तुमची दोघांची तिकिटं काढतोय मी".

बोलल्याप्रमाणे विकासने दहा तारखेची तिकिटं पाठवली. बाळासाहेब आणि रजनीताईंच्यापुढे दुसरा काही पर्यायच नव्हतं. जमेल तेव्हढी आवराआवर करून आणि बाकीच्या गोष्टी विश्वासू मित्रमंडळींकडे सोपवून बाळासाहेबांनी आणि रजनीताईनी अमेरिकेला जाण्याची तयारी केली आणि त्यांच्या बी वन - बी टू अस्थलांतरित व्हिसावर दोघंही वॉशिंग्टनला पोहोचले.

राज आणि व्हिकी सुरुवातीला परक्या माणसांना पाहून बुजले. खरं तर ही छोटुकली मुलं आता तेवढी छोटुकली राहिली नव्हती. मुलं मोठी झाल्यामुळे खूपच समज त्यांना आली होती. पण नंतर मात्र दोघांच्याही डोक्यात कुठेतरी अंधुक असे जुनी कौटुंबिक आपुलकीचे धागे जागृत झाले असावे. रजनीताईंनी ते ओळखलं

आणि हळू हळू मुलांच्या कलाने घेत, त्याना त्यांच्या परिचित नावांनी हाक मारत, गोड अंगाई गीते गुणगुणत मुलांना त्यांनी आपलंसं केलं.

विकास आई बाबाना घेऊन इमिग्रेशन लॉयरकडे गेला आणि त्याच्या मदतीने बाळासाहेबांच्या आणि रजनीताईंच्या स्थलांतरित व्हिसासाठी, म्हणजे ग्रीन कार्ड साठी अर्ज सादर केला.

रूथच्या आणि विकासच्या घटफोस्टाच्या हिअरिंगची नोटीस आली. विकास, मुलं आई बाबा, नॅनी, सगळेचजण कोर्टात गेले. रूथला मुलांच्या संगोपनाचा जबाबदारी नको आहे आणि विकास व त्याचं कुटुंब, ही जबाबदारी घेण्यास पूर्ण समर्थ आहे, हे कोर्टाने जाणलं आणि मुलांचा कबजा विकासकडे दिला. दोन्ही कडच्या वकीलांनी बसून खलबतं केली, पैसा, स्थावर-जंगम इस्टेट या सर्वांच्या वाटणीबद्दल बोलणी केली आणि सामंजस्य करार कोर्टाला सादर केला. कोर्टाने त्यावर शिक्का मोर्तब केलं आणि विकासच्या पहिल्या विवाहाच्या अंकावर पडदा पडला.

दिवस जात होते. ऋतू बदलत होते. समर सीझनचा फॉल सीझन झाला. अमेरिकेचा संपूर्ण इशान्य किनारा निसर्गाच्या विविध रंगांनी नटला. विकासने आई बाबाना घेऊन फॉल कलर्स दर्शनाची छोटीशी सफर केली. विविध रंगांनी नटलेल्या झाडांचा, वृक्षांचा, जंगलाचा, सृष्टीचा अनोखा नझारा पाहून सर्वचजण सुखावले. राज आणि व्हिकी बरोबर होतेच. त्या पिटुकल्याना, अर्थात, खाणे , पिणे, खोड्या करणे याव्यतिरिक्त कशात फारसा इंटरेस्ट नव्हता पण त्यांनी सर्वांचं मनोरंजन छानच केलं.

फॅाल नंतर चोरट्या पावलांनी आला हिवाळा. बाळासाहेबाना आणि रजनीताईना पुण्याच्या हिवाळ्यापेक्षा जास्त तीव्र हिवाळा माहितच नव्हता. त्यामुळे वॅाशिंग्टनच्या हिवाळ्याशी त्यांचं सख्य अजिबात झालं नाही.

विकास म्हणायचा,  बाबा हा तुमचा पहिलाच हिवाळा आहे. हळू हळू होते त्याची सवय". पण बाळासाहेबाना आणि रजनीताईना खात्री होती की या उतरत्या वयात एवढ्या तीव्र हिवाळ्याची सवय होणं केवळ अशक्य होतं. कुठेही बाहेर शक्यतो न फिरता घरातल्या टेम्परेचर कंट्रोलचं सेटिंग ८० अंश फॅरनहाइटला ठेवून ते घरातल्या घरात वावरत असत.

एका वीक एन्डला बाहेर स्वच्छ ऊन पडलं होतं, थंडी होती, पण उन्हात नहायला बरेच लोक बाहेर पडले होते. विकासने आई बाबानाही जबरदस्तीने गरम कपड्यांचा जामानिमा करवून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला पण ते तयारच नव्हते. मनोमन दोघांनीही हे जाणलं  होतं की इथे राहून मुलांचं संगोपन करत राहणं, तेही आपला स्वत:चा जीव संभाळून, ही जरा अवघडच गोष्ट होती.

रजनीताई विचार करत होत्या,  जगाच्या कानाकोपऱ्यातून, 'अमेरिकन ड्रीम, अमेरिकन ड्रीम' असा कंठशोष करत लोक इकडे धावत येतात पण इथे आल्यावर त्यांनी  त्यांच्या मनात बाळगलेल्या मायदेशाच्या स्वप्नांचा चुराडा नसेल का होत !

## प्रकरण ४

राज आणि व्हिकी आता घरभर दुडदुड धावायला लागले होते. सगळ्या खोल्यांमधे धावायचे, जिन्यावरून सरपटत वर खाली जायचे, कशाला तरी धरून वर वर चढायला बघायचे.

बाळासाहेबांच्या आणि रजनीताईंच्या लक्षात आलं की मुलं जसजशी मोठी होणार तसतसा त्यांचा अल्लडपणा, चापल्य वाढतच जाणार. त्यातून इथलं हे टोकाचं हवामान. आयुष्य भारतात, आणि त्यातूनही, पुण्यात काढलेल्या वयस्क लोकांना इथे सलगपणे जास्त दिवस राहणं अवघड हे त्यांच्या लक्षात आलं होतं.

बाळासाहेब विकासला म्हणाले,  विकास, तुझ्या त्या स्थलांतरित व्हिसाचा आणि ग्रीन कार्डचा आम्हाला फारसा उपयोग नाही कारण इथे आम्हाला नोकरी करायची नाही की कार चालवायची नाही.  आमच्या दहा वर्षाच्या बी वन , बी टू, मल्टी एन्ट्री व्हिसावर आम्ही करू ये जा. इथे पाच सहा महिन्यांच्या वर सलगपणे राहण्याचा काही आमच्यात दम नाही. इथला हिवाळा, मुख्यत्वेकरून, आम्हाला सहन होत नाही."

हिवाळ्याचा जेम तेम एक महिना सरला होता, अजून तीन-चार महिने बाकी होते.

बाळासाहेब विकासला म्हणाले,  विकास, हिवाळ्याचे हे उरलेले तीन महिने आम्ही भारतात घालवू म्हणतो. तीन महिन्यांनंतर येऊ परत आम्ही. तोवर या नॅनी तर आहेतच, आणखी कोणी ट्रेन्ड हेल्पर कामावर ठेवा आणि मुलांचं मॅनेज करा. येऊ परत आम्ही. असंच चालू ठेवू, गरज असे पर्यंत."

विकासने पाहिलं की थंडीने आई बाबा अगदीच जेरीला आलेत, तेव्हा त्याने दोघांचीही भारतात जाण्याची तिकिटं काढली. प्रवासी सीझन असल्याने दोन आठवड्यानंतरची तिकिटं मिळाली.

बाळासाहेब आणि रजनीताई सामानाच्या बांधाबांधीला लागले.

रजनीताईंच्या मनात विचारचक्र चालू होतं. ‘आपण भारतात जातोय खरं, पण ती केवळ आपली सोय म्हणून. विकासचं काय, या छोट्या बाळांचं काय ! काहीतरी कायमस्वरुपी उपाय निघायला हवा’.

‘असा उपाय निघाला पाहिजे की सर्वांना विन विन सिच्युएशन असावी’.

रजनीताईनी देवीला हात जोडले, “सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके……”

आणि त्या थांबल्या. त्याना मंगला आठवली, प्रतिमा आठवली.

‘रूथच्या जागी प्रतिमा असती तर हा प्रसंग ओढवला नसता’ रजनीताई विचार करू लागल्या. ‘एक चान्स घ्यावा का ! प्रतिमाला शोधावे आणि चाचपून पहावं की ती सध्या काय करते? खरं पाहिलं तर लग्न वगैरे करून ती कदाचित तिच्या संसारात पूर्ण गुरफटूनही गेली असेल. आणि इथली परिस्थितीही आता वेगळी होती. विकासला पत्नी हवी होती, तसच त्याच्या दोन बाळाना आई हवी होती.’

तरीसुध्दा, का कोण जाणे, रजनीताईना मनोमन वाटत होतं की प्रतीमाच आपल्याला तारून नेणार.

“अहो, मंगलाला फोन लावा”. बाळासाहेबांना रजनीताईनी फर्मान सोडलं.

काही प्रश्न न विचारतां बाळासाहेबानी मान डोलावत मंगलाला फोन लावला, फोन रजनीताईंच्या हातात दिला.

बऱ्याच दिवसानंतर फोन केला गेला असला तरी रजनीताईनी नमस्कार चमत्कार, कुशल विचारणे - सांगणे यात फारसा वेळ न घालवतां सरळ मुख्य मुद्द्यालाच हात घातला.

“मंगला, हल्ली ती भाऊजींची पुतणी, प्रतिमा, कुठे असते गं ? तुमचा काही कॉन्टॅक्ट आहे का तिच्याबरोबर ?”

“नाही गं रजनी”. मंगला म्हणाली. “तिची तिकडे लॉंग आयलंडच्या हॉस्पिटलमधे बदली झाल्यानंतर आमचा आणि तिचा काही कॉन्टॅक्ट राहिला नाही. सुरुवातीचा एक महिना आम्ही फोन करायचे तिला. पण नंतर ती कामात एवढी बिझी झाली की फोनवर सुध्दा भेटायची मारामार झाली.”

जरा थांबून मंगला म्हणाली, “नंतर, बरं का रजनी, तिथल्याच कोणा गोऱ्या डॉक्टरशी तिने लग्न केलं. तिच्या आईला नव्हतं हे पसंत, पण तिने केलं खरं. मात्र नंतर आम्ही ऐकलं की वर्षाभरातच ते लग्न निकालात निघालं. मग तिनेही त्या लॉंन्ग आयलंडच्या हॉस्पीटलमधून बदली करून घेतली. आता ती ॲटलांटाला असते म्हणे.”

रजनीताई आणि बाळासाहेब गप्प होते. ही सगळी माहिती रिचवत होते.

नंतर मंगलाच पुढे म्हणाली, “पण रजनी, इतक्या दिवसांनी एकदमच का आठवण केलीस आमच्या प्रतिमाची?”

आडपडदा कशाला ठेवायचा. रजनीताईनी सोईस्कर वाटेल तसं सांगितलं. “मंगला, ही डॉक्टर मंडळी सगळी सारखीच. कामाच्या रामरगड्याला एवढं स्वत:ला जुंपून घेतात, की लग्न वगैरे व्यावहारिक गोष्टींचा विचार करायला त्यांच्याकडे वेळच नसतो. आमचा विकासही तसाच बसलाय, लग्नाशिवाय. मागे एका भेटीत विकासचं आणि प्रतिमाचं तसं ठीक जुळलं होतं. तिच्या लांब जाण्याने सगळीच चक्रे थांबली होती. पण आता परिस्थिती जरा वेगळी आहे. या मुलांची वयही वाढत चाललीत आणि आम्हीही थकत चाललोय. तेव्हा मनात आलं आपलं, की थांबलेली चक्रं पुन्हा चालू होतील तर पहावं.”

मंगलाला ऐकून बरं वाटलं.

"जरूर रजनी, करून पहा तुम्ही फोन तिला. नंबर तोच असणार बहुधा. चान्स घ्यायचा आपला." मंगला म्हणाली.

इकडचं तिकडचं संभाषण झालं आणि रजनीताईनी फोन डिस्कनेक्ट केला.

त्याच रात्रीची नऊ ची वेळ. मुलं झोपायला गेली होती. विकास. रिलॅक्सड मूड मधे होता.

"आई, बाबा, काय म्हणताय बांधाबांध झाली?" विकासने विचारले.

"बाळा आम्ही जातोय खरं उद्या, पण मुलांची काळजी वाटते रे. या नॅनीच त्यांच्याकडे पहाणार की दुसरी काही भक्कम सोय पहायचा विचार आहे तुझा?" रजनीताईनी विचारलं.

"या नॅनीना जुमानणार नाहीत ही मुलं, आई." विकास म्हणाला. "दोन्ही मुलांकडे पूर्ण वेळ लक्ष द्यायला  हे शेजारीच राहणारं कूपर दाम्पत्य आहे, ते तयार झालेत. चांगले लोक आहेत आई, पीटर नुकताच रिटायर झालाय आणि मॅगी हाऊस वाईफ आहे. दिवसा ते तासाचे दहा डॉलर घेतील आणि रात्री तासाचे सहा डॉलर घेतील. रेटही रीझनेबल आहे आणि मुलांचं प्रेमाने करतील दोघंही."

अमेरिकेत सगळेच व्यवहार कमर्शिअल तत्वावर होतात हे रजनीताई ऐकून होत्या. पण शेजारधर्माची किंमतही पैशात मोजावी लागते ही कल्पना पचनी पडणे त्याना अवघड वाटत होतं.

"बाळा, एक कल्पना आली आहे माझ्या डोक्यात. जरा नीट ऐक मी काय सांगते ते आणि बघ काय वाटतं ते." रजनीताई म्हणाल्या. "काल आपल्या न्यू जर्सीच्या मंगला आत्याचा फोन आला होता. इकडचं तिकडचं बोलता बोलता प्रतिमाचा विषय निघाला."  रजनीताई बोलायच्या थांबल्या. पण विकासकडून काहीच प्रत्युत्तर न आल्याने त्या नेटाने पुढे म्हणाल्या , "त्या म्हणत होत्या की दोन वर्षांपूर्वी लॉंग आयलंडच्या कोणा सहकारी डॉक्टर बरोबर तिने लग्न केलं म्हणे. पण

वर्षाभरानंतर ते लग्न मोडलं. आणि बरंका विकास, प्रतिमा आता त्याच कंपनीच्या ॲटलांटाच्या हॉस्पिटलमधे असते म्हणे.'' रजनीताई परत थांबल्या. विकास आपला गप्पच. हूं नाही की चूं नाही.

मग रजनीताईंनीच नेट धरला आणि त्या पुढे म्हणाल्या, ''विकास बाळा, दोन तीन वर्षांपूर्वी तू प्रतिमाला भेटला होतास तेव्हा तिच्याबद्दल तसं बरं मत झालं होतं तुझं. पण मग तुम्ही दोघंही आपापल्या व्यवसायांमधे इतके गुरफटून गेलात की तुमचा एकमेकांशी परिचय वाढवण्याचा विषय बाजूलाच राहिला. मला वाटतंय बाळा अजूनही वेळ गेली नाही. प्रतिमा चांगली मुलगी आहे, आपल्या संस्कृतीत वाढलेली आहे. सध्या विनापाश आहे. तुला अनुरूप आहे. बाळा, तुझ्याकडे तिचा नंबर असेल तर कॉन्टॅक्ट कर फोनवर. नथिंग टु लूज''.

रजनीताई थांबल्या. अर्धं मिनिट शांततेत गेलं.

` ''आई, विचार करतो मी'', विकास म्हणाला.

त्या रात्री रजनीताईना गाढ झोप लागली. देवी मातेचा आशिर्वाद मिळाला होता नं !

दुसऱ्या दिवशी सकाळची अकराची फ्लाईट. रिपोर्टिंग आठ वाजता. सकाळी सातला घरून निघायला लागलं. जाताना रजनीताई काही बोलल्या नाहीत पण एअरपोर्टवर उतरल्यावर निरोप घेताना मात्र त्या विकासला म्हणाल्या, ''बाळा काल प्रतिमाबद्दल आपलं बोलणं झालं ते लक्षात आहे ना?''

''हो आई, करतोय मी विचार, बघुया. कळविन तुम्हाला काही मेजर डेव्हलपमेंट असेल तर'' विकास म्हणाला, आणि त्याने आई बाबांचा निरोप घेतला. बाळासाहेबानी तोपर्यंत ट्रॉली आणली होती आणि तिच्यावर सामान चढवून दोघे एअरपोर्टमधे शिरले.

## प्रकरण ५

२२ तासांच्या प्रवासानंतर बाळासाहेब आणि रजनीताई मुंबईला पोहोचले आणि एअरपोर्टवरच टॅक्सी करून पुढच्या चार तासांनी त्यांनी पुणे गाठले.

श्रम परिहार, जेट लॅगवर मात करणे, बंद केलेल्या सेवा परत सुरू करणे या सर्व गडबडीत दोन दिवस गेले.

तिसऱ्या दिवशी विकासचा फोन आला.

"आई, आपलं बोलणं झाल्यावर विचार केला मी. ठीक वाटलं." विकास बोलत होता. "पण प्रश्न आता माझा एकट्याचा नाही हे तितकंच खरं. आई एक तासापूर्वी मी प्रतिमाला फोन केला. मारिएट्टाच्या एका मोठ्या फॅसिलिटीमधे ती काम करतेय".

"हे मारिएट्टा कोठे आहे?" रजनीताईनी विचारलं

"मारिएट्टा नं, ॲटलांटा- जॉर्जियाच्या जवळच". विकासने सांगितले. "तर आई, तिला बरं वाटलं मी फोन केल्याचं. मग अर्धा तास बोलत होतो आम्ही. भेटायचं ठरलंय. आई, पुढचा वीक एन्ड लॉन्ग वीक एन्ड आहे, शनिवार रविवारला लागून सोमवारी सुध्दा नॅशनल  हॉलीडे आहे. शनिवारच्या सकाळच्या फ्लाईटने जाईन मी ॲटलांटाला. रविवारी सकाळच्या फ्लाईटने येईन परत. इथे हॉस्पिटलमधे सांगून जावं लागेल की त्या दोन दिवसात कार्डियाक इमर्जन्सी कोणी हाताळायची ते.  आणि घरी मुलांकडे पहायला कूपर दाम्पत्य आहेच. त्यानाही सांगून ठेवायला लागेल."

"ॲटलांटाला ओव्हर नाईट राहण्याचं काय करणार?" बाळासाहेबांनी विचारले.

"बघुया बाबा" विकास म्हणाला, "मारिएट्टाच्या त्या फॅसिलिटीच्या कार्डियाक डिपार्टमेंटनधे कोणीतरी ओळखीचे डॉक्टर भेटतीलच. त्यांच्या विचाराने चांगलं हॉटेल करीन बुक."

चक्रं फिरायला लागली होती. त्यांचा वेग, प्रवेग, काहीही आता पुणेकरांच्या कंट्रोलमधे नव्हतं.

आठ दिवस गेले. बाळासाहेब आणि रजनीताईंच्या पुण्याच्या जीवनक्रमाची गाडी आता जवळ जवळ पूर्वपदावर आली होती. शनिवारी संध्याकाळी चहा घेता घेता रजनीताई बाळासाहेबांना सांगत होत्या, "आता विकास ॲटलांटाची फ्लाईट घ्यायला निघाला असेल. रविवारी दुपारपर्यंत येईल परत घरी. रविवारी संध्याकाळी म्हणजे आपल्या सोमवारच्या सकाळी फोन येईल. देवी अंबेला म्हटलंय मी, सुरळीत होऊन जाऊ दे सगळं. नकोसा वाटतोय हा २४ -२५ तासांचा प्रवास, जेट लॅग, तिकडे जाऊन परावलंबी रहायचं. आपली माणसं भेटतात खरी. पण ती असतात वेगळ्याच विश्वात. आम्हाला नाही जागा त्या विश्वा मधे, त्यांच्या अमेरिकन ड्रीम मधे."

सोमवारची सकाळ गेली, संध्याकाळही गेली. फोन काही आला नाही. मंगळवारही गेला.

रजनीताईनी हाय खाल्ली. 'हा बार फुसका निघाला की काय ?'

बुधवारी सकाळी फोन आला. विकासची मंगळवारची रात्र.

"आई सोमवारी सुटी होती नं, त्यामुळे रविवारी सकाळी न निघतां, दोन दिवस राहिलो आणि सोमवारी संध्याकाळी तिकडून निघालो मी. सोमवारी घरी पोहोचेपर्यंत बारा वाजले. आज सकाळी उठून हॉस्पिटलला गेलो. त्यामुळे तुम्हाला फोन करायला हाच पहिला चान्स मिळाला." विकास म्हणाला.

विकास पुढे सांगत होता, “प्रतिमा भेटली. ती काम करतेय ते मोठं हॉस्पिटल आहे, आणि एक उत्तम गायनेकॅालॉजिस्ट म्हणून चांगलं नाव कमावलंय तिने.”.

“ॲटलांटाला रहायची, जेवणाची सोय बरी झाली नं, हॅाटेल बरं मिळालं का?” रजनीताईनी विचारलं.

हॅाटेलमधे नाही आई, प्रतिमाच्या घरीच राहिलो. तिनेच सुचवलं तसं.” विकास म्हणाला.

रजनीताईनी आणि बाळासाहेबांनी एकमेकांकडे कटाक्ष टाकले.

“बरंच बोलणं झालं आमचं आई. शेवटी दोघांनीही ठरवलं की, इट इज वर्थ गिव्हिंग इट ए ट्राय”. विकास म्हणाला.

बाळासाहेबांनी मान हलवली. “हे ‘इट’ म्हणजे काय आणि ‘ट्राय’ कशाला द्यायचा? जरा नीट समजेलसं सांगशील का विकास !” बाळासाहेबानी विचारलं.

“सांगतो बाबा”. विकास म्हणाला. “आम्ही असं ठरवलं की शक्य तेवढ्या लवकर, मारिएट्टा सोडून प्रतिमा ने वॅाशिंगटन डी सी ला यायचं. इथे तिने माझ्याच घरात मूव्ह इन व्हायचं. बाबा, आमच्याच हॅास्पिटलमधे तिला अपॅाइंटमेंट मिळेल. मी बोललोय आमच्या हॅास्पिटलच्या चीफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरशी. त्यांच्या कानापर्यंत प्रतिमाच्या गायनॅकोलॅाजी मधल्या नैपुण्याबद्दलची ख्याती पोहोचली आहे आणि आनंदाने त्यांनी आमच्या हॅास्पिटलमधे प्रतिमाला सिनिअर गायनेकॅालॅाजिस्टची पोस्ट ऑफर केली आहे. हे तर खरंच सोनियाहून पिवळं आहे बाबा. आणि बरं का बाबा, प्रतिमाची एवढी ख्याती आहे की ते तिला म्हणाले, ‘जस्ट वॅाक इन एनी टाईम’. कमाल आहे नं बाबा !”

“ते सगळं ठीक आहे रे,” बाळासाहेब म्हणाले, “हे ‘मुव्ह इन’ काय आहे.? अं ? तिने नुसतंच येऊन रहायचं ? लग्न वगैरे काही नाही ? अरे विधियुक्त नाही तरी रजिस्टर लग्न व्हायला पाहिजे.”

"बाबा हल्ली असं झालंय नं", विकास म्हणाला, "लग्नापूर्वी काही कमीटमेंटशिवाय लिव्ह इन असणं बरं. लग्नानंतर प्रॅाब्लेम आले तर त्यांचं निराकारण करणे तेव्हढं सोपं रहात नाही. बाबा, इथे आपल्या पुण्याचीच कितीतरी पोरं अशी राहतायत. आणि बाबा, सगळं ठाकठीक असेल तर वर्षानंतर करू नं विधियुक्त लग्न"

'लग्न करा, वा न करा, मुलांना प्रेमळ आई मिळाल्याशी कारण'. रजनीताई मनात विचार करत होत्या.

"विकास बाळा, पण मुलांचं काय, मुलांकडे नीट बघेल नं ती? सांगितलंस नं तू सगळं तिला ? हो, ही गोष्टं महत्त्वाची आहेच आपल्या दृष्टीने." रजनीताईनी विचारलं.

"हो आई, सांगितलं मी सगळं", विकास म्हणाला, "कितपत आम्ही सर्व जबाबदाऱ्या निभावू शकू याची पूर्ण छाननी केली आम्ही, आई."

"आई, एक प्रॅाब्लेम आहे". विकास जरा खालच्या आवाजात बोलला. "आई, प्रतिमाला एक एक वर्षाच्या जुळया मुली आहेत".

"अरे, देवा !" रजनीताईंच्या तोंडातून उत्स्फूर्त उद्गार आले.

सगळेच जण गप्प झाले.

वातावरण हलके करण्यासाठी बाळासाहेब म्हणाले, "विकास, अॅडॅम सॅंडलरचा 'ब्लेन्डेड' हा चित्रपट आठवतोय का"?

विकास खळखळून हसला. "हो बाबा", विकास म्हणाला, "अॅडॅम सॅंडलर, ड्र्यू बॅरिमूर. अॅडॅमच्या मुली, आणि बॅरिमूरचे मुलगे. दोन फॅमिलीज, बाय चान्स, आफ्रिकन सफारीवर एकत्र येतात आणि मग एकेक गमतीदार प्रसंग होतात. तेच आठवलं आम्हाला शनिवारी रात्री आणि आम्ही खूप हसलो. म्हटलं की आपल्याला तो आदर्श डोळयांसमोर नाही ठेवायचा. एक फॅमिली म्हणून चांगल्या भारतीय संस्कारात मुलांना वाढवता आलं पाहिजे."

पुन्हा शांतता.

“ठीक आहे, विकास. बोलू उद्या.” बाळासाहेब म्हणाले.

“हो बाबा”, विकास म्हणाला आणि फोन डिस्कनेक्ट केला.

“ही कसली आठवलीय अवदसा याला , दुसऱ्याची पोरं संभाळत बसायची !” रजनीताईनी उद्गार काढले.

“अगं, राज आणि व्हिकी रूथची मुलं नं ? मग रूथच्या मुलांशी प्रतिमाचा तरी काय संबंध ?” बाळासाहेब म्हणाले, “प्रतिमाने त्यांची आई बनावं अशी अपेक्षा ठेवलीच आहे नं आपण ! जबाबदारीची देवाण घेवाण आहे ही. जशी असेल त्या स्वरूपात स्वीकारलीच पाहिजे.”

रजनीताई निरुत्तर झाल्या. पण दुसरीच अनामिक भीती त्यांच्या मनात घोळायला लागली.

दुसऱ्या दिवशी सकाळी परत विकासचा फोन.

“आई, एक बोलायचं होतं”. विकास म्हणाला. “आई, बाबा, मी आहे कार्डिओलॉजिस्ट आणि प्रतिमा आहे गायनेकॉलॉजिस्ट. दोन्ही क्षेत्रात इमर्जन्सी पेशंट येतच असतात आणि कित्येकदा क्षणाचाही वेळ न दवडता आम्हाला धावत जावं लागतं. आई, ही मुलं फार लहान आहेत. सध्या काही महिने इथे माझ्याकडे येऊन राहण्याचा विचार कराल का तुम्ही? तुमचा ग्रीन कार्डचा प्रोसेस मध्यंतरी आपण स्थगित केला होता, तो सुरू करायला सांगू एजंटला ? चालेल नं ?”


रजनी ताईंच्या ‘पुणेरी स्वप्नाने’ गरूड पक्षाकडून पंख उसने घेतले होते आणि ते खांद्याला लावून ते स्वप्न उंच भरारी घेऊन उडून जाण्याच्या विचारात होते.

उंच टोपी घातलेले अंकल सॅम एम्पायर स्टेट बिल्डिंगच्या मनोऱ्यावरून उतरून खाली आले होते आणि बाळासाहेब आणि रजनीताई चिटणिसांशी शेकहॅंड करण्यासाठी हात पुढे करण्याच्या विचारात होते.

बाळासाहेब रजनीताईना म्हणत होते, “इतके दिवस आपण आपलं लाइफ आपल्याला हवं तसं कंट्रोल केलं, आता देऊया थोडा कंट्रोल या मुलांच्या हातात ! हेच म्हणायचं, आपलं ‘सुधारित पुणेरी स्वप्न’. पटतंय नं !”.

****समाप्त*****












श्री सुधीर कारखानीस यांची या पूर्वीची सात पुस्तके. क्लिक करताच उघडतील.



# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सतरावे वर्ष.
# श्री सुधीर कारखानीस यांचे ईसाहित्यवर हे आठवे पुस्तक.

श्री सुधीर कारखानीस हे एक ज्येष्ठ इंजिनियर व तंत्रज्ञ आहेत. त्यांची यापूर्वी तंत्रज्ञानावरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत तसेच दोन कथासंग्रहही आहेत. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. सुधीरजींनी आपल्या आयुष्यात अनेकदा आणि बराच काळ विदेशात व त्यातही प्रगत देशांत व्यतीत केला आहे. आणि त्यांच्या कथांतून तेथील जीवन आणि भारतातले जीवन यांच्या तुलना येत असतात. या कथा स्वानुभवातून आलेल्या असल्याने त्या वास्तवाच्या जवळच्या आहेत आणि त्यातून दोन्ही जगांच्या ऋण आणि धन बाजू समजतात.

श्री सुधीर कारखानीस यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१२), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे

महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (८), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४२), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (५), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (५), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य

प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें